आदेश

क्र.कावि/उपजि.भू-सं.(लसिंका)/अ.का./२९/2018
उपजिल्हाधिकारी भूसंपादन (ल.सिं.का.)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 04 /07/2018

प्रति,

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (ल.सिं.का.)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा.

विषय :- भूसंप्रक्र 43/2008-09 मौजे दादगांव, ता. नांदूरा, जि. बुलडाणा प्रकरणात कलम 11 (1) खालील प्रारंभिक अधिसूचनेस एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 19(7)

*****

उपरोक्त विषयांकित भूसंपादन प्रकरण आपल्या कार्यालयांस सुरु असून, सदर प्रकरणांत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 11 (1) खालील अधिसूचना शासन राजपत्रात दिनांक 20 जुलै, 2017 रोजी व चावडीवर (तलाठी कार्यालय) दिनांक 15 जुलै, 2017 रोजी प्रसिध्द झालेली आहे. सदर प्रकरण शासन राजपत्रानुसार दिनांक 19 जुलै, 2018 रोजी व्यपगत होत आहे. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 19 (7) नुसार जेव्हा प्राथमिक अधिसूचनेच्या (कलम 11 (1) नूसार) तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत पोटकलम (1) अन्वये कोणतीही घोषणा प्रसिध्द केलेली नसेल तेव्हा, अशी घोषणा रदद करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. अशी तरतूद आहे.

सदर प्रकरणात भूसंपादन संस्थेकडून अदयाप पावेतो कलम 15 (2) चौकशी अंतर्गत प्राप्त आक्षेप पुर्तता अहवालावरील नमुना ड मधील तुलनात्मक तक्त्यावर भूंसपादन संस्थेचे अभिप्राय प्राप्त झालेला नाही. सबब उक्त भूसंपादन प्रकरणातील कलम 11 (1) खालील अधिसूचनेस एक वर्षाची मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 19 (7) नुसार कलम 11 (1) खालील अधिसूचनेस एक वर्षाची मुदतवाढ देणेबाबत तरतूद आहे.

सबब मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, मी जिल्हाधिकारी, बुलडाणा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 19 (7) नुसार सदर भूसंपादन प्रकरणातील कलम 11 (1) खालील प्रारंभिक अधिसूचनेस दिनांक 18/07/2019 पर्यत पुढील अटी व शर्तीचे आधारे मुदतवाढ देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

1) मुदतवाढी बाबत कलम 11 (1) चे अ ते ई प्रमाणे प्रसिध्दी करणे बंधनकारक राहील.
2) कलम 19 (1) मध्ये नमूद केल्यानुसार पुनर्वसाहत क्षेत्र घोषित करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी करणे बंधनकारक राहील.
3) यंत्रणेने कलम 19 ची घोषणा करणेपूर्वी आवश्यक रक्कम जमा करणे बंधनकारक राहील.
4) कलम 19 (7) नुसार ही मुदतवाढ अंतिम असेल. त्यामुळे सर्व विहीत कालावधीत कार्यवाही करणे उपजिल्हाधिकारी भूसंपादन व यंत्रणेवर बंधनकारक राहील. सदर बाबत पुनश्चः मुदतवाढ मिळण्याची तरतूद नाही.

Pange
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

Scanned by CamScanner